दैनिक
# महावृत्त
ई - मेल dainikmhavratt@gmail.com
संपादक : अशोक हनवते.मो.९४२१०९४९९१,७२६४०७९९९०




लातूर वर्ष ३ रे अंक १०७ वा शनिवार दि.०९ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# लातूर कृषी विभागात संगनमताने ५८ लाखांचा अपहार करणाऱ्यांवर कार्यवाही न झाल्यास सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार : संजयभाऊ कांबळे

लातूर : लातूर कृषी विभागात संगनमताने ५८ लाखांचा अपहार करणाऱ्यांवर कार्यवाही न झाल्यास सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार अशी माहिती ८ सप्टेंबर रोजी पत्रकार परिषदेत संजयभाऊ कांबळे यांनी दिली. कृषी विस्तार योजनेअंतर्गत सन २०१५ - १६ च्या दुष्काळसदृश्य परिस्थितीत कमी पाण्यामध्ये अधिक उत्पन्न काढण्यासाठी कृषी विस्तार योजनेअंतर्गत लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने लक्षावधींची तरतूद केली होती. या योजनेत लातूर कृषी विभागातील अधिकारी - कर्मचाऱ्यांनी संगनमताने ५८ लाखांचा अपहार केला आहे. या प्रकरणी उच्च न्यायालयाने दोषींवर योग्य ती कार्यवाही करण्याचे आदेश दि. १७ ऑगस्ट २०२३ रोजी दिले आहेत. या आदेशानुसार योग्य ती कार्यवाही न झाल्यास आपण पुन्हा एकदा उच्च न्यायालयात पुनर्याचिका दाखल करणार अथवा सर्वोच्च न्यायालयात दाद मागणार असल्याची माहिती जनहित याचिकाकर्ते भारतीय दलित पँथरचे कार्याध्यक्ष संजयभाऊ कांबळे यांनी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली.




लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कमी पाण्यावर अधिक उत्पन्न काढण्यासाठी सन २०१५ - १६ मध्ये प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने लाखो रुपयांची तरतूद केली होती. मात्र लातूरच्या कृषी विभागातील तालुका कृषी अधिकारी, काही मंडळ कृषी अधिकारी व कृषी सहाय्यकांनी संगनमताने कट रचून शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे तर सोडाच शेतकऱ्यांना हा विषय आपल्याशी संबंधित आहे याची पुसटशीही कल्पना नसताना आपआपसात प्रशिक्षण दिल्याचा बनाव करून तब्बल ५८ लाख रुपयांचा अपहार केला आहे असे सांगून संजयभाऊ कांबळे पुढे म्हणाले की,प्रशिक्षण दिल्याच्या बोगस पावत्या सादर करून शेतकऱ्यांची व शासनाची फसवणूक करणाऱ्या दोषी अधिकारी - कर्मचाऱ्याविरुद्ध आपण वर्ष २०१७ पासून सातत्याने लढा देत आहोत. या प्रकरणी आपण उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रं . ४५/ २०२१ दाखल केली होती. या याचिकेचे सूक्ष्म अध्ययन करून उच्च न्यायालयाने आपल्या दि. १७ ऑगस्ट २०२३ च्या आदेशात ' कायद्याने विहित केलेल्या योग्य प्रक्रियेचे पालन करण्याचे आणि अनुज्ञेय असेल त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करून दि. १ नोव्हेंबर २०२३ रोजी उच्च न्यायालयात अहवाल सादर करण्याचे आदेश कृषी आयुक्त पुणे यांना दिले आहेत.

याप्रकरणी झालेल्या फसवणुकीची चौकशी करण्याची मागणी आपण एक लेखी तक्रार देऊन केली होती. आपल्या मागणीनुसार कृषी आयुक्त पुणे यांच्या आदेशाने चौकशी अधिकारी म्हणून विभागीय अधीक्षक कृषी अधिकारी डी.जी. मुळे यांची नेमणूक केली होती. मुळे यांनी सलग एक वर्ष तीन महिने या प्रकरणाची सखोल चौकशी करून तब्बल ७६२९ पानांचा पुराव्यासह चौकशी अहवाल दि. ३ एप्रिल २०१९ ला सादर केला. मात्र संपूर्ण पुराव्यानिशी अहवाल सादर करूनही दोषींवर कार्यवाही न झाल्याने आपण शेवटी जनहित याचिका दाखल केली. आता उच्च न्यायालयानेच दि. १ नोव्हें. २०२३ पर्यंत कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचप्रमाणे कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर यांनी दि. २१ मार्च २०२२ रोजी दोषी अधिकारी - कर्मचाऱ्यांवर अपहाराच्या रकमेसह नाव, पदाचा स्पष्ट उल्लेख करून दोषारोपपत्र दाखल केले आहे. परंतु पोलिसात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया केली नाही. ही प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून अहवाल सादर करण्याची लेखी विनंती आपण कृषी आयुक्तांना प्रत्यक्ष भेटून केली आहे. एवढे होऊनही पोलिसात गुन्हा दाखल नाही झाल्यास आपण न्हा एकदा उच्च न्यायालयात पुनर्याचिका दाखल करणार आहोत. तसेच गरज भासल्यास सर्वोच्च न्यायालयातही जाणार आहोत. या प्रकरणी सांगितले. तकऱ्यांना न्याय मिळवून दिल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नसल्याचे संजयभाऊ कांबळे यांनी सांगितले.

# राज्यात पाऊस सक्रीय, अनेक ठिकाणी प्रतीक्षा

मुंबई : महाराष्ट्रात ब-याच दिवसांनी पावसाने हजेरी लावली. मुंबईसह पश्चिम उपनगरात आज पावसाने जोरदार हजेरी लावली असून महाराष्ट्रातही अनेक भागात आज पाऊस झाला. त्यामुळे राज्यातील बळीराजा सुखावला आहे. पुढील दोन दिवस राज्यात सर्वत्र पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. दरम्यान, नाशिक भागात जोरदार पाऊस झाल्याने गोदावरी नदीला पूर आला आहे.

तसेच कोकण, पश्चिम महाराष्ट्रातही पाऊस सुरू आहे. तसेच मराठवाड्यातही ब-याच भागात पावसाने हजेरी लावली. परंतु मोठ्या पावसाची अद्याप प्रतीक्षा आहे. राज्यात ऑगस्ट महिन्यात पावसाने ओढ दिली होती. मात्र, सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीपासूनच पावसाने हजेरी लावली. त्यामुळे माना टाकलेल्या खरीप पिकाला दिलासा मिळाला आहे.



मुंबईच्या पश्चिम उपनगरात आज दिवसभरात मुसळधार पाऊस झाला. अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर, विलेपार्ले, वांद्रे, सांताक्रुज परिसरात पावसाची जोरदार बॅटिंग सुरू आहे. आज मुंबईसह उपनगगरात जोरदार पावसाने हजेरी लावली. पावसामुळे अनेक सखल भागात पाणी साचले तर मध्य रेल्वेच्या वाहतुकीवरही पावसाचा परिणाम झाला.

पालघर जिल्ह्यातही जोरदार पाऊस झाला. भिवंडी शहर तसेच ग्रामीण भागातही रात्रीपासून पाऊस झाला.

नाशिकच्या मालेगावातही पावसाने सलग दुस-या दिवशी हजेरी लावली. या पावसाने काहीसा दिलासा मिळाला. मात्र, बळीराजाला अद्यापही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. जळगाव जिल्ह्यातही एक महिन्याच्या विश्रांतीनंतर पाऊस झाला. त्यामुळे शेतक-यांना दिलासा मिळाला. याशिवाय कोकणातही सिंधुदुर्ग जिल्ह्यासह इतरत्र जोरदार पाऊस सुरू आहे. पश्चिम महाराष्ट्रातही पावसाने हजेरी लावली. त्यामुळे अनेक ठिकाणी पिकांना जीवदान मिळाले.

मराठवाड्यातही काही ठिकाणी हजेरी

मराठवाड्यातील बहुतांश भागात अद्याप दमदार पाऊस झालाच नाही. जेमतेम पावसावर पिके जगत आहेत. मात्र, अजूनही सरसकट पाऊस होत नाही. तुरळक ठिकाणी पाऊस हजेरी लावत असल्याने मराठवाड्याला मोठ्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे. शुक्रवारी छत्रपती संभाजीनगर, हिंगोली जिल्ह्यात पावसाने हजेरी लावली. इतरत्र मात्र, तुरळक ठिकाणी पाऊस झाला. लातूर, उस्मानाबादमध्ये शुक्रवार कोरडा गेला.

गोदावरीला पूर

अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर काल मध्यरात्रीपासून नाशिकसह जिल्ह्यात पावसाने जोरदार हजेरी लावली. गंगापूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार सुरु आहे. त्यामुळे गंगापूर धरणातील पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे गंगापूर धरणातून विसर्ग सोडण्यात आला आहे. त्यामुळे गोदामाई खळाळली आहे. अनेक दिवसांनंतर दुतोंड्या मारुतीच्या पायाला पाणी लागल्याने नाशिककर सुखावले आहेत. नाशिक शहरासह जिल्ह्यात दोन महिन्यापासून पावसाने ओढ दिली होती.

# जगभरातील नेत्यांचे जंगी स्वागत

नवी दिल्ली : जी-२० शिखर परिषदेसाठी जगभरातील प्रमुख नेते भारतात दाखल झाले आहेत. ९ आणि १० सप्टेंबर रोजी होणा-या या परिषदेसाठी आंतरराष्ट्रीय नेत्यांनी आज सकाळपासून दिल्लीच्या विमानतळावर हजेरी लावायला सुरुवात केली. प्रत्येक नेत्याचे स्वागत भारतीय मंत्र्यांकडून करण्यात आले.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन, ब्रिटनचे पंतप्रधआन ऋषी सुनक, जपानच्या पंतप्रधान फुमियो किशिदा, रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गेई लावरोव यांच्यासह अनेक विदेशी नेते राजधानी दिल्लीत दाखल झाले आणि त्यांचे विमानतळावर जंगी स्वागत करण्यात आले. बायडेन भारतात येताच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन चर्चा केली.



ऐतिहासिक जी-२० परिषदेसाठी विदेशातील जवळपास ५०० नेते उपस्थित होत आहेत. शिखर परिषदेसाठी रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावरोव दिल्लीत दाखल झाले. ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक दिल्लीत दाखल झाले. त्यांचे केंद्रीय मंत्री अश्विनीकुमार चौबे यांनी स्वागत केले. जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा दुपारी दिल्लीमध्ये दाखल झाले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेनही शुक्रवारी सायंकाळी दिल्लीत दाखल झाले. त्यांचेही जंगी स्वागत करण्यात आले.

यासोबतच इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलेनी, अरजेंटियाचे अध्यक्ष अल्बर्ट फर्नाडझ, आफ्रिकन संघाचे प्रमुख अझली असायुमानी, युरोपीयन युनियनच्या अध्यक्ष व्रुसुला वोन डेर लायेन, आयएमएफ प्रमुख क्रिस्टालिना जॉर्जिवा, युरोपियन कॉन्सिलचे प्रमुख चार्ल्स मिचेल, डब्ल्यूटीओ कार्यकारी प्रमुख नगोझी ओकनजो-इवेला, मॅक्सिकोच्या अर्थमंत्री रकेल बुईनरोस्ट्रो सानजेझ, ओईसीडी प्रमुख सचिव मॅथिस कोरमनही दाखल झाले आहेत.

मंत्री, अधिका-यांसह बायडेन दाखल

अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन भव्य अशा विमानातून आपले मंत्री आणि अधिका-यांसोबत दिल्ली विमानतळावर उतरले. यावेळी भारताकडून त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. जनरल व्ही. के. सिंह बायडेन यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. अत्याधुनिक अशा कारमधून ते आपल्या हॉटेलकडे रवाना झाले. त्यांच्या राहण्याची व्यवस्था आयटीसी मौर्य शेरेटन हॉटेलमध्ये करण्यात आली आहे. अमेरिकेन प्रतिनिधींसाठी ५०० खोल्या बूक करण्यात आल्याची माहिती आहे.

# मनपाचे कर्मचारी दत्ता सोनवणे सेवानिवृत्त




लातूर :- लातूर शहर महानगरपालिकेचे जन्म - मृत्यू विभागातील कर्मचारी दत्ता सोनवणे ९ सप्टेंबर रोजी सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांचा सत्कार जन्म - मृत्यू विभागातील निबंधक अधिकारी कर्मचारी यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी सेतू विभागाच्या प्रमुख पवार मॅडम, निबंधक बिडवई मॅडम, जाधव,सतिष कांबळे,विजय शेटे,गडदे मैडम,गरजे,फिसके,असिफ शेख, शर्मा, बावगे अप्पा,शेख खदिर, अभिमन्यू पाटील,व सर्व कर्मचारी उपस्थित होते

# जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते 'शासकीय योजना पुस्तिका'चे प्रकाशन

लातूर, दि. ८ (जिमाका): मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सवी वर्षानिमित्त लातूर जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने 'शासकीय योजना पुस्तिका' तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत झाले.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन दाताळ, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांच्यासह विविध माध्यमांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळावी, त्यांना संबंधित योजनेचे निकष, या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे आदी अनुषंगिक बाबींची माहिती एकत्रित स्वरुपात उपलब्ध व्हावी, यासाठी लातूर जिल्हा माहिती कार्यालयामार्फत जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त निधीतून 'शासकीय योजना पुस्तिका' तयार करण्यात आली आहे.

'शासकीय योजना पुस्तिका' ही अतिशय माहितीपूर्ण असून यामध्ये शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा समावेश आहे. जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ही पुस्तिका मार्गदर्शक ठरेल, असे जिल्हाधिकारी वर्षा-ठाकूर घुगे यांनी पुस्तिका प्रकाशन कार्यक्रमात सांगितले.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# भ्रष्टाचाराशी लढा

'धनाचा माग काढा' हे भ्रष्टाचारासारख्या गंभीर आर्थिक गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी उपयुक्त सिद्ध झालेले धोरण आहे. याच तत्त्वाच्या आधारावर, भारताने गेल्या काही वर्षांत अशा काही उपाययोजना राबवल्या आहेत, ज्यामुळे लाच घेणे अत्यंत घातक (नुकसानकारक) ठरले आहे. मात्र असे असले तरी, अशा धोरणातही काही त्रुटी, काही छिद्रे राहून जातात. कारण आज मोठ्या प्रमाणात जागतिकीकरण झालेल्या जगात, भ्रष्टाचाराची कमाई सहजपणे देशांच्या सीमा ओलांडून पलीकडे पाठवली जाऊ शकते. आपल्या जी–२० अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत भारताने ह्या त्रुटी कमी करण्यासाठी, सुधारित आणि प्रभावी आंतरराष्ट्रीय सहकार्यातून या खाचाखोचा भरण्यासाठीची मोहीम हाती घेतली आहे. भ्रष्टाचाराशी संबंधित गुन्ह्यांसंदर्भात औपचारिक सहकार्य, गुन्हेगारी प्रकरणांशी संबंधित परस्पर कायदेशीर सहकार्याद्वारे म्हणजेच एमएलए व्यवस्थेद्वारे केले जाऊ शकते.

वित्तीय कृती दला (ऋ–ढक्र)ला, अशा प्रकरणात, देशांनी ह्या एमएलए अंतर्गत, तपास, शिक्षा आणि संबंधित इतर प्रक्रिया वेगाने पूर्ण कराव्यात अशी अपेक्षा असते. मात्र अनेकदा वस्तुस्थिती तशी नसते. उदाहरणार्थ, परस्पर कायदेशीर सहकार्य २०२३ विषयी जी–२०ची जबाबदारी निश्चित करणारा अहवाल जी–२० च्या भ्रष्टाचार विरोधी कार्य गटाच्या १२ ऑगस्ट रोजी कोलकाता येथे झालेल्या तिसऱ्या, म्हणजेच मंत्रीस्तरीय बैठकीत जारी करण्यात आला. ह्या अहवालात, काही विशिष्ट जी–२० सदस्य देशांना या प्रकरणात एमएलएच्या विनंती अर्जांचा विषय मार्गी लावण्याचा उल्लेख असल्याचे दिसून येत आहे. अहवालात विशद केल्याप्रमाणे, भारताने एमएलएच्या मार्फत आलेल्या सर्व विनंत्या १०० टक्के निकाली लावल्या असल्याचे दिसते आहे. मात्र, त्याचवेळी भारताने केलेल्या एमएलए विनंत्यांपैकी १० टक्के विनंत्या देखील सोडविण्यात आलेल्या दिसत नाहीत. एमएलएच्या विनंत्यांचा निपटारा करण्यात होणाऱ्या विलंबास अनेक घटक कारणीभूत आहेत, असे दिसते. जसे की देशांतर्गत कायदेशीर चौकटींमध्ये असलेले मतभेद, पुरेशा आणि वेळेत मिळणाऱ्या प्रतिसादाचा अभाव. अशा विलंबांचा परिणाम तत्काळ होणाऱ्या तपासावर होत असतो. तसेच एकूणच भ्रष्टाचाराची प्रक्रिया खणून काढत, ती पूर्णपणे थांबविण्याच्या प्रयत्नांवरही होत असतेच. त्यामुळे, जे देश भ्रष्टाचाराविरोधात लढा देत आहेत, त्यांच्या लढ्यात अनेक त्रासदायक अडथळे निर्माण होतात. भ्रष्टाचार करणाऱ्यांची एक सर्वज्ञात अशी मोडस ऑपरेंडी असते. ती म्हणजे, आपली दुष्कत्ये आणि त्यातून मिळालेला अवैध पैसा बनावट कंपन्यांच्या जाळ्यात दडवून ठेवणे. अशा संपत्तीचा शोध घेतांना, देशांना, अशा बनावट कंपन्यांच्या लाभार्थी मालकांची सविस्तर माहिती मिळणे आवश्यक असते. भारत आणि इतर काही मोजक्या देशांनी अशा कंपन्यांमधील लाभार्थी मालकांची माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध करून दिली आहेत. मात्र बहुतांश देशांनी ते दिले नाहीत. त्यामुळे, अशा लाभार्थी मालकांविषयीची महत्त्वाची माहिती त्यांच्याकडून मिळणे अत्यावश्यक आहे.

एकदा जर, भ्रष्टाचारी व्यक्तीने मिळवलेल्या अशा संपत्ती, मालमत्तेचा शोध लागला, की मग तपासकर्त्यांना, अशी मालमत्ता गोठवणे आणि जप्त करणे अशा प्रक्रियांसाठी देखील सहकार्याची गरज असते. जेणेकरून, भ्रष्टाचारी व्यक्तींना आपल्या अशा अवैध संपत्तीची विल्हेवाट लावण्याची संधी मिळू नये. त्याशिवाय, अशा प्रकरणात खटले उभे करण्यासाठी पुरावे गोळा करण्यातही सहकार्य आवश्यक असते. भारताने आपल्या जी–२० अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत या दृष्टीने सातत्याने प्रयत्न केले आहेत. जेणेकरून आंतरराष्ट्रीय सहकार्यामधील त्रुटी दूर करता येतील. त्याच आनुषंगाने केलेल्या महत्त्वाच्या प्रयत्नांची माहिती, खालील परिच्छेदांमध्ये नमूद केली आहे.

मालमत्ता वसुली :

भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यातून मिळवलेल्या धनाची पुनर्प्राप्ती आणि परतावा हा भ्रष्टाचार विरोधी धोरणाचा उद्देश असावा, याबद्दल भारताने जी–२० सदस्यांमध्ये सर्वसहमती घडवून आणण्यात यश मिळवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एक महत्त्वाची पायरी म्हणजे एमएलए (अंमलबजावणी) पूर्व सल्लामसलत सक्रियपणे करणे, यावर भारताने भर दिला आहे. भारताच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत, जी–२० देशांनी अशा अवैध संपत्तीचे विघटन टाळण्यासाठी त्यावर वेळेत प्रतिबंध घालणे, गोठवण्याची किंवा जप्तीची रक्कम सुनिश्चित करण्यासाठीही सहमती दर्शविली आहे. या उद्दिष्टाची पूर्तता करण्यासाठी, संबंधित देशातील संस्थांना, त्यांच्या आर्थिक गुप्तचर विभाग किंवा इतर संबंधित प्राधिकरणांना पुरेसे अधिकार, प्रक्रिया आणि आवश्यक साधने प्रदान करण्याची आवश्यकता असू शकते ज्यामुळे गुन्ह्यातून मिळालेल्या संशयित मालमत्तेचे हस्तांतरण किंवा अपव्यय रोखता येईल, हेही लक्षात घेतले गेले आहे. ही एक अत्यंत महत्त्वाची उपलब्धी आहे, विशेषतः आज इंटरनेट तंत्रज्ञानात झालेल्या नवनवीन संशोधन आणि प्रगतीमुळे, पैसा दुसरीकडे वळवण्याची प्रक्रिया अत्यंत सोपी आणि जलद झाली आहे आणि म्हणून, त्या महत्त्वाच्या वेळी जर अशा संस्थांना त्वरित हालचाली करता आल्या तरच ते चोरलेला निधी रोखून परत मिळवू शकतील.

लाभार्थी मालकी असलेल्यांची माहिती :

एका अंदाजानुसार, अशा अज्ञात व्यक्तींच्या मालकीची असलेली जगभरातील एकूण संपत्ती, सुमारे ७ ट्रिलियन डॉलर्स ते ३२ ट्रिलियन डॉलर्स इतकी असावी. ही संख्या, एकूण जागतिक संपत्तीच्या सुमारे १० टक्के इतकी आहे आणि जर त्या त्या देशातील अधिकारक्षेत्रात असलेल्या कंपन्या आणि संस्थांची मालमत्ता तसेच नियंत्रण करणाऱ्या व्यक्ती यांची माहिती जर देशांना द्यायची नसेल, तर अशी संपत्ती लपवणे अतिशय सोपे आहे. वित्तीय कृती दलाने आपल्या मानकांमध्ये, लाभार्थी मालकत्वाच्या बाबतीतली पारदर्शकता अधिकाधिक सुधारण्यासाठीचा मार्ग मोकळा केला आहे.

# करा आपली खरेदी आपल्याच मनाप्रमाणे

वाचून प्रश्न पडला असेल ना की, आपल्याच पैशाने आपली खरेदी आपण करतो मग शीर्षक असे का? कारण कधीकधी ती दुसऱ्याच्या अभिप्रायाप्रमाणे आणि मताप्रमाणेही होऊ शकते. आतापर्यंत ग्राहक खरेदी करायचे ती प्रत्येकाची आवड–निवड, किंमत, दर्जाप्रमाणे तसेच टीव्ही, रेडिओवरच्या जाहिराती बघून – ऐकून आणि छापील जाहिराती वाचून. आताच्या डिजिटल युगात वस्तूंची जाहिरात करण्याचा परिघ विस्तारला आहे. वेगवेगळ्या समाज माध्यमांवर जाहिरात करण्यास पसंती मिळते आहे. हल्ली जवळजवळ प्रत्येक जण समाज माध्यमांवर सक्रिय असतो. इन्स्टाग्राम, फेसबुक, ट्विटर, यूट्यूब, ब्लॉग या सर्व समाज माध्यमांवर असे इन्फ्लुएन्सर असतात. इन्फ्लुएन्सर म्हणजे अशी प्रभावशाली व्यक्ती की जिच्या एका पोस्टमुळे ग्राहकांच्या खरेदी करण्याच्या निर्णयांवर परिणाम होऊ शकतो. ग्राहक हे वस्तू किंवा सेवा खरेदी करण्यासाठी निवडीचा हक्क बजावत असतातच. पण या हक्कांवर कोणी गारुड घालत असेल तर? वेगळ्या शब्दांत सांगायचे झाले तर, एखादी वलयांकित व्यक्ती, एखाद्या क्षेत्रात हे इन्फ्लुएन्सर आवडतात कारण त्यांच्या अनुयायांना ते प्रचारित करणारी उत्पादने खरेदी करण्यास उद्युक्त करतात. प्रथम उत्पादक इन्फ्लुएन्सरची माहिती गोळा करतात. त्यानंतर त्यांना त्यांच्या उत्पादनांचे समर्थन करण्याचे काम दिले जाते. यांचे छोटे – मोठे गट केले जातात. लाखो फॉलोअर्स त्यांचा एक गट, हजारो असतील तर दुसरा एक गट वगैरे. त्यांच्या फॉलोअर्सच्या आकड्यांवर इन्फ्लुएन्सरचे मानधन ठरते. यातूनच हे इन्फ्लुएन्सर भरपूर पैसे कमावतात. एका अंदाजानुसार अशा प्रकारच्या समर्थनांसाठी २०२१ मध्ये ९०० करोड रुपये खर्च करण्यात आले होते. २०२५ मध्ये हाच आकडा तब्बल २२०० करोड रुपयांवर पोहोचेल असा अंदाज आहे. एका अर्थी हे इन्फ्लुएन्सर वस्तूचे किंवा सेवेचे 'ब्रँड अम्बॅसॅडर्स' असतात.

जेव्हा अशा इन्फ्लुएन्सर्सचा फारच बोलबाला होऊ लागला तेव्हा सरकारच्याही लक्षात आले की ही सुद्धा एक प्रकारची जाहिरातबाजीच आहे. त्यामुळे यावरही अंकुश असायलाच हवा. सेंट्रल कन्झ्युमर प्रोटेक्शन ऑथॉरिटी (सीसीपीए)मार्फत उदाहरण द्यायचे झाले तर ब्रिज हॉटेल्स आणि रिसॉर्ट्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे देता येईल. एका इन्फ्लुएन्सरने या हॉटेलबाबत आपल्या अकाऊंटवर बरीच भलामण केली होती. नियमावलीनुसार ही सर्व माहिती 'पेड प्रमोशन' आहे असे त्यांच्या सर्व व्हीडिओमध्ये दाखवणे बंधनकारक होते; परंतु तसे काही त्या पोस्टमध्ये नव्हते. तक्रार जेव्हा चर्चेला आली तेव्हा हॉटेलची बाजू मांडण्यासाठी कोणीही हजर नव्हते. आस्कीने हे मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन असल्याचे म्हटले. त्यामुळे ही तक्रार योग्य आहे असा एकतर्फी निर्णय दिला. अशीच आणखी एक तक्रार विसावा रिसॉर्टबाबतीत आस्कीच्या लक्षात आली होती. त्यावरही असाच निर्णय दिला गेला.

इन्फ्लुएन्सर्सचे अनुकरण करणारे लोक (फॉलोअर्स) मात्र त्याने सांगितलेले विश्वासार्ह आहे की नाही याची शहानिशा न करता त्याचे अनुकरण करतात. ते सांगतात त्या सर्व सोयी–सुविधा तेथे जाणाऱ्यांना खरंच योग्य प्रमाणात उपलब्ध आहेत का? हे प्रश्न मनात आणून आपली सहल/भ्रमंती याची



प्रसिद्ध पावलेली व्यक्ती कोणतीही वस्तू किंवा सेवा याबद्दल सांगत असेल, तर ग्राहकांचा त्यावर सहजच विश्वास बसतो. ग्राहकांच्या याच मानसिकतेचा फायदा जाहिरातदार उचलतात.

समाज माध्यमांवरील इन्फ्लुएन्सरकडे विशिष्ट विषयांचा अभ्यास असतोच असे नाही. प्रभावी सादरीकरण करण्याची हातोटी मात्र त्यांच्याकडे असते. असे लोक त्यांच्या सोशल मीडिया चॅनेलवर त्या विषयावर नियमित पोस्ट करतात आणि मोठ्या प्रमाणात त्यांचे फॉलोअर्स (अनुकरण करणारे लोक) तयार करतात. यांनाच इन्फ्लुएन्सर म्हणतात. उत्पादक मंडळी अशा इन्फ्लुएन्सरचा उपयोग जाहिरातीसाठी किंवा 'प्रमोशन'साठी करू लागले आहेत. जाहिरातदारांना काही मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. उदाहरणार्थ कायद्याने या समर्थनाला जाहिरात असेच संबोधण्यात येईल आणि त्यामुळेच जाहिरातविषयक सर्व नियम त्यांना लागू असतील. तसेच ज्या उत्पादनाबद्दल काही म्हणायचे आहे त्याची इन्फ्लुएन्सरने पूर्ण माहिती आधी घ्यावी, आपण जे काही म्हणत आहोत त्याची पूर्ण जबाबदारी घ्यावी.

जानेवारी २०२३ मध्ये 'डव्हटाईझिंग स्टँडर्ड्स कौन्सिल ऑफ इंडिया'ने (एएससीआय) ग्राहकांची फसवणूक होऊ नये, त्यांची सुरक्षितता अबाधित राहावी यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे / सूचना जारी केल्या आहेत. अगर कोणी या सूचना पळत नसेल तर आस्की स्वतःहून त्यावर कार्यवाही करते. योजना आखताना सर्वांनी फक्त या इन्फ्लुएन्सर्सचे अनुकरण न करता स्वतः त्या हॉटेल किंवा रिसॉर्टच्या विशिष्ट साईटवर पाहून आपापल्या आवडीप्रमाणे, गरजेनुसार माहिती मिळवली पाहिजे. म्हणजेच आपण सर्व ग्राहकांनी कोणतीही वस्तू किंवा सेवा विकत घेताना ग्राहकांच्या निवडीच्या हक्काबरोबरच चिकित्सा करून निर्णय घेणे हे कर्तव्य बजावले पाहिजे आणि जागरूक राहायला हवे. त्याचप्रमाणे इन्फ्लुएन्सरनी दिलेल्या माहितीचे अंधानुकरण न करता आणि दुसऱ्या कोणाच्याही प्रभावाखाली न येता निर्णय घेतले, तरच आपली खरेदी आणि विकत घेत असलेली सेवा आपल्या हातात राहून ती स्वतःच्या मनाप्रमाणे हवी तशी करता येईल.

# फेरीवाले, रिक्षाचालक; शिस्त कोण लावणार?

रोज सकाळी उठून कार्यालय किंवा रोजगाराची, कामाची ठिकाणे गाठण्यासाठी मुंबई, ठाणे परिसर म्हणजेच महामुंबईत राहणाऱ्या चाकरमान्यांना मोठी कसरत करत कधीकधी 'जान हथेली पर' घेऊन प्रवास करावा लागतो. सर्वच रेल्वे स्थानकांच्या परिसरात कमी अधिक प्रमाणात अशीच नरकपुरी दिसेल. वेड्यावाकड्या लावलेल्या रिक्षा रिक्षाचालकांचा आरडाओरडा, डोकेदुखी होईल असा कमालीचा गोंगाट जमिनीवर सर्वत्र कचरा, धूळ, प्रदूषण त्यातून वाट काढत पुढे जावे तर फेरीवाले, टपरीवाल्यांनी पदपथ अडवलेला मध्येच एखादी बेस्टची बस रस्ता अडवून उभी आणि रिक्षावाले व बसवाले यांच्यातील हमरीतुमरी हे प्रकार तर नित्याचेच. उपनगरीय लोकल ही चाकरमान्यांची लाईफलाईन समजली जाते. मुंबई, ठाणे आणि ठाण्याच्या पलीकडे अगदी बदलापूरपर्यंत रोज लाखो चाकरमानी पोटापाण्यासाठी या लाईफलाईनने प्रवास करतात. सकाळ , संध्याकाळच्या वेळेची लोकलमधील गर्दी ही पाचवीला पुजलेली असली, तरी रोज या प्रवासासाठी गाठाव्या लागणाऱ्या रेल्वे स्थानकांच्या परिसरातून वाट काढताना नरकपुरी वाटावी अशा प्रचंड बजबजपुरीच्या 'छळा'लाही चाकरमान्यांना सामोरे जावे लागत आहे.

अस्ताव्यस्त आणि मनमानीप्रमाणे पसरलेले व सतत वाढत चाललेले छोटे – मोठे फेरीवाले, त्यांच्या जोडीला जणू पाचवीला पुजल्याप्रमाणे बेशिस्त रिक्षावाल्यांचा गलका आणि घोळका, तर काही ठकाणी बेकायदा बांधकामांचीही गर्दी अशा बजबजपुरीने सगळ्याच स्थानकांना घेरल्याचे त्रासदायक चित्र दिसत आहे. गेले कित्येक दिवस न बदललेली ही स्थिती सुधारण्याची खरीखुरी जबाबदारी ही संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था आणि रेल्वे प्रशासनाची आहे. सध्या नगरसेवक नसल्याने संबंधित पालिका अधिकारी आणि कर्मचारी तसेच पोलीस यंत्रणा कधी कधी धृतराष्ट्राच्या भूमिकेत असल्याने त्यांच्या डोळ्यांना जणू पट्टी बांधलेली आहे. कारण त्यांची उपस्थिती जाणवत नाही अशी स्थिती सध्या दिसत आहे. या साऱ्यांच्या डोळ्यांदेखत शहरं बकाल आणि बेशिस्त भासू लागली आहेत. त्यात दिवसेंदिवस भर पडत चालली आहे. यंत्रणांच्या या भोंगळ, ढिसाळ कारभाराचा फार मोठा फटका मात्र सर्वसामान्य प्रवाशांना नियमित बसत आहे. रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरावर फेरीवाले, रिक्षा, टॅक्सी स्टँड असू नयेत. परिसर मोकळा असावा असे स्पष्ट निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्याचे येथे सर्रास उल्लंघन केले दिसते. मनमानी पद्धतीने रिक्षा उभ्या केलेल्या असतात. ध्वनिप्रदूषण आणि वायू प्रदूषणाने येथे कधीच मर्यादा ओलांडली आहे. रिक्षाचालक गुटखा, मावा खाऊन कुठेही थुंकत असल्याने येथे आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती आहे.

मुंबई सीएसएमटी, चर्चगेट यांसारख्या मोठ्या स्थानकांचा परिसर म्हणा किंवा तेथील भुयारी मार्ग, हे नेहमीच फेरीवाल्यांनी गिळंकृत केल्यासारखे दृश्य असते. भुयारी मार्ग म्हणजे फेरीवाल्यांसाठी जणू मुक्त कुरण. भुयारी मार्गांच्या उतरणाऱ्या पायऱ्यांपासून दुसरीकडे वर जाण्याच्या मार्गांवर फेरीवाले आपली पथारी पसरून, कोकलत उभे असतात. तसेच तेथील अधिकृत दुकानांच्या गाळ्यांसमोरही सर्वत्र फेरीवाले बसत असल्याने त्यांनी जणू संपर्ण भुयारी मार्गच अडविलेला असतो. लोकलच्या गर्दीत पुरता पिचून बाहेर पडलेला मुंबईकर पुढे जाऊन या फेरीवाल्यांच्या जंजाळात अडकतो व तेथून मार्ग काढत त्याला वेळेवर ऑफिस गाठण्याची कसरत करावी लागते. या त्रासाबद्दल अलीकडेच काही वृत्तपत्रांत बातम्या छापून आल्यानंतर सीएसएमटी परिसरात पालिका, पोलिसांनी कारवाई करून सध्या थोडा दिलासा दिला आहे. अशाच प्रकारे भायखळा, दादर, कुर्ला, घाटकोपर, भांडुप, मुलुंड, ठाणे, दिवा, डोंबिवली, अंबरनाथ, बोरिवली अशा सर्वच स्थानकांच्या परिसरात ही बजबजपुरी असते. काही तक्रारी झाल्यावर किंवा काही ठरावीक काळानंतर पालिकांचे पथक अचानक (सामान्यांना वाटते) तेथे येते, फेरीवाल्यांची थोडीशी पळापळ होते. बहुतेकांना या कारवाईची आधीच खबर लागलेली असल्याने त्यांनी हवी तशी सावधगिरी बाळगलेली असते. पण काही बेसावध असलेल्यांना कारवाईच्या बडग्याला सामोरे जावे लागते. एकूणच कारवाई केली जात असल्याचे चित्र दिसू लागते. रस्ते काही काळासाठी मोकळे होतात. सर्वांनाच बरं वाटतं. पण ते फारच थोड्या काळासाठी हे समाधान टिकते. पुन्हा सारं 'येरे माझ्या मागल्या' प्रमाणे वांद्रे पूर्व रेल्वे स्थानकालगत काही दिवसांपूर्वी पालिकेने हातोडा चालविल्यानंतर या परिसरातील अराजकतेचा विषय ऐरणीवर आला आहे. या भागातील झोपड्यांच्या तीन ते चार मजली टॉवर इतकाच तेथील रिक्षांचा विषय डोकेदुखी ठरला आहे. पालिका, वाहतूक पोलिसांनी कारवाई केल्यानंतर एक – दोन दिवस शिस्त लागते. त्यानंतर पुन्हा परिस्थिती 'जैसे थे'च दिसते. पलीकडे वांद्रे पश्चिमेला चांगली स्थिती आहे, अशातला भाग नाही. मात्र तिथे स्थानकाबाहेर मोठी जागा असल्याने प्रवाशांना ये–जा करताना थोडे सुसह्य होते.पूर्वेकडील परिसर आधीच लहान असून त्यात रिक्षांचा मोठा अडसर आहे. रेल्वेच्या पुलावरून खाली पाऊल टाकताच प्रवाशांची कसरत सुरू होते. पुरेशा साफसफाईअभावी

# नेहमी मोमोज खाल्ल्यामुळे तुमचे आरोग्य धोक्यात येऊ शकते? वाचा, तज्ज्ञ काय सांगतात

सध्याच्या धावपळीच्या जीवनात अनेकांना फास्ट फूड खायला आवडते. पिझ्झा, बर्गर, सँडविचसारखे पदार्थ लोक आवडीने खातात. काहींना मोमोजथही खूप आवडतात. हल्ली सगळीकडे मोमोजचे स्टॉल लावलेले दिसून येतात आणि या स्टॉलवर मोमोजप्रेमींची तुफान गर्दी दिसून येते. पण मोमोज नेहमी खाणे आपल्या आरोग्यासाठी चांगले आहे का? याविषयी मुंबईच्या कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ भक्ती सामंत यांनी 'द इंडियन एक्स्प्रेसशी' बोलताना माहिती दिली.

त्या सांगतात, मोमोज हे वाफवलेले असतात आणि त्यात भाज्या किंवा मांस-मटणाचा वापर केला जातो तरीसुद्धा त्यात पौष्टिक घटक कमी असतात. यात मैदा किंवा रिफाइंड पिठाचा अतिवापर केला जातो. विशेष म्हणजे जेव्हा तुम्हाला कळेल की, महिनाभर मैदा न खाणे आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे, तेव्हा जर तुम्ही मैदा न खाण्याचा विचार कराल तर मोमोज खाणेही तुम्हाला सोडावे लागेल. उजाला सिग्नस ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या आहारतज्ज्ञ एकता सिंघवाल सांगतात, मोमोज आठवड्यातून एक प्लेट खाण्यास काहीही हरकत नाही. जोपर्यंत तुम्ही संतुलित आहार घेता आणि त्याविषयी नेहमी जागरूक असता तोपर्यंत तुम्हाला कोणतेही दुष्परिणाम दिसून येत नाही. आरोग्यावर परिणाम होऊ न देता, मोमोजचा आनंद घेण्यासाठी मोमोज करण्याची पद्धत, त्यात वापरण्यात आलेल्या सामग्रीची माहिती घेणे गरजेचे आहे.

आहारतज्ज्ञ सिंघवाल आणि सामंत यांनी 'द इंडियन एक्स्प्रेस'शी बोलताना मोमोजमध्ये असलेल्या सामग्रीच्या आधारावर मोमोज नेहमी खाणे चांगले आहे का, हे समजावून सांगितले आहे.



मैदा

मोमोजचे बाहेरील आवरण तयार करण्यासाठी मैदा वापरला जातो. मैदा हा गव्हाचा असा प्रकार आहे की, ज्यावर प्रक्रिया केली जाते आणि त्यामुळे यातील पोषक घटक आणि फायबर नष्ट होते. नेहमी मैद्याचा वापर केल्यामुळे लठ्ठपणा येऊ शकतो. त्यामुळे मधुमेह आणि उच्च रक्तदाबासारखे आजार वाढतात.

मोनोसोडियम ग्लुटामेट (चङ्ख)

मोमोज तयार करण्यासाठी मोनोसोडियम ग्लुटामेट (चङ्ख)चा वापर केला जातो. त्यामुळे पचनशक्ती मंदावते आणि लठ्ठपणा वाढू शकतो. मोनोसोडियम ग्लुटामेट हे ग्लुटामिक सिडपासून बनवले जाते. यात सोडियम असते; जे उच्च रक्तदाब आणि किडनीचा आजार असलेल्या लोकांसाठी हानिकारक आहे. त्यामुळे या लोकांनी मोमोज खाणे टाळावे.

सामग्रीची गुणवत्ता

अनेक जण रस्त्याच्या कडेला असणाऱ्या स्टॉलवरील मोमोज खातात. हे मोमोज अतिशय स्वस्त दरात विकले जातात. कारण- या मोमोजमध्ये वापरली जाणारी सामग्री निकृष्ट दर्जाची असते. अनेकदा लोकप्रिय स्टॉलवरून खाताना किंवा पैसे वाचवताना ग्राहक सामग्रीच्या गुणवत्तेकडे लक्ष देत नाहीत.

अनेक मोमोजविक्रेते भरपूरर नफा मिळविण्यासाठी कमी दर्जाची सामग्री वापरतात; पण त्याचा दुष्परिणाम आपल्या आरोग्यावर दिसून येतो.

मांस आणि भाज्या

अनेकदा वाफवलेले पदार्थ चांगले शिजलेले नसतात. मोमोज करताना मांस किंवा भाज्या चांगल्या न शिजल्यामुळे उलट्या किंवा जठरासंबंधीच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

चटणी

मोमोजची चव वाढवण्यासाठी त्याबरोबर जी चटणी दिली जाते, ती खूप मसालेदार असते. त्यात लाल मिरची पावडरचाही अतिवापर केला जातो. त्यामुळे ॲसिडिटी, पोटदुखीचा त्रास जाणवू शकतो.

आहारतज्ज्ञ एकता सिंघवाल यांनी मोमोज खाताना खालील गोष्टींची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे :

वाफवलेले मोमोज खा; तळलेले मोमोज खाणे टाळा.

चरबीयुक्त पदार्थांपेक्षा चिकनचे मोमोज खा.

सोडियम सॉस आणि मसाल्यांचे कमी सेवन करा.


संतुलित आहाराचा विचार करता, नेहमी मोमोज खाणे टाळा.

मोमोज बनवताना किंवा खाताना स्वच्छता पाळा.

एखाद्या वेळी मोमोजचा आनंद घेणे काहीही चुकीचे नाही किंवा आरोग्यास कोणताही धोका नाही; पण दीर्घकाळ चांगले आरोग्य राहण्यासाठी आरोग्यदायी आहार आणि जीवनशैलीकडे लक्ष देणे तितकेच गरजेचे आहे.

# मधुमेहाच्या रुग्णांच्या दृष्टीवर परिणाम होण्याचा धोका

नवी दिल्ली : मधुमेहच्या रुग्णांना आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होण्याचा धोका असतो. त्याचबरोबर या रुग्णांच्या डोळ्यांच्या पडद्या (रेटीना) भोवती कोलेस्ट्रेरॉल जमा होऊ शकतो. या कारणामुळे रुग्णांच्या दृष्टीवर वाईट परिणाम होतो. अशा स्थितीत अंधत्व येण्याची शक्यता संशोधकांनी व्यक्त केली आहे. अमेरिकेतील मिशिगन स्टेट युनिव्हर्सिटीच्या एका गटाच्या नेतृत्वाखाली या संबंधी करण्यात आलेल्या संशोधनानंतर मधुमेहाच्या धोक्याची माहिती मिळाली आहे. प्रा. ॲमेरिटस ज्युलिया यांनी सांगितले की, 'रेटीनोपॅथी' अंधत्वाचे प्रमुख कारण असून टाईप १ आणि टाईप २ मधुमेहाच्या सर्वात अधिक गुंतागुंतीच्या स्थितीतील एक




आजार आहे. मधुमेहाच्या रुग्णांमध्ये २० वर्षांत रेटीनोपॅथीचा त्रास काही प्रमाणात होतो. तसेच याबाबत रुग्णांना अंतिम टप्प्यात माहिती होते. संशोधकांनी सांगितले की, हे धमन्यांमध्ये तयार होणाऱ्या आणि हृदयविकाराच्या झटक्यास कारण ठरणाऱ्या 'कॉलेस्ट्रेरॉल क्रिस्टल अॅथेरोरक्लोरोटिक प्लाक'मध्ये आढळणाऱ्या 'क्रिस्टल'प्रमाणेच असते. संधोधनात सहभागी असलेल्या प्रा. टीम डोरव्हेइलर यांनी सांगितले की, रेटीनामध्ये कोलेस्ट्रेरॉल कमी प्रमाणात जमा व्हावे यासाठी काय करता येईल याबाबत आम्ही संशोधन करत आहोत.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परीसरात सर्व प्रकारचे वैद्यकीय शिक्षण मिळणारे हब निर्माण करण्याचे प्रयत्न- माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

लातूर (प्रतिनिधी) -विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न असलेल्या सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल त्वरीत सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी तसेच रिक्त जागा भरण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा. येथे एकाच ठिकाणी सर्व प्रकारचे वैद्यकीय शिक्षण मिळणारे हब निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करावा, अशी सूचना करून त्यासाठी पाठपुरावा करण्याची ग्वाही राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिली.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. ८ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी लातूर शहरातील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या कार्याचा व विविध विकासकामांचा आढावा घेऊन संबंधितांना आवश्यक सूचना केल्या. बैठकीच्या प्रारंभी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. समीर जोशी यांनी महाविदयालयात राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली.



महाविदयालयातील शैक्षणिक सुधारणासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी तसेच रूग्णावर उपचार करण्यासाठी उभारावयाच्या सोयीसुवीधांच्या माहीतीचे त्यांनी यावेळी सादरीकरण केले. डॉ. उदय मोहिते यांनी या महाविदयालयाच्या उभारणी संबंधी पार्श्वभुमी विशद केली. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी जो उददेश ठेऊन हे महाविदयालय सुरू केले तो उददेश आता साध्य होत असल्याचे त्यांनी म्हटले. आमदार अमित विलासराव देशमुख वैदयकीय शिक्षण मंत्री असतांना लातूर येथील वैदयकीय महाविदयालयात २५० ते ३०० कोटी रूपय खर्चाचे प्रकल्प मंजूर झाले आहेत. त्यांची कामे सदया प्रगतीप-थावर आहेत. त्यांच्या पाठपूरावातून आणखी २५० कोटीचे प्रकल्प मंजूर झाले आहेत. त्यांचीही कामे लवकरच सुरू होतील. महाविदयालयाचे अधिष्ठाता डॉ. जोशी यांनी महाविदयालया संबंधी सादरीकरण केल्यानंतर बोलतांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, अल्पावधीत हे वैद्यकीय महाविद्यालय नावारूपाला आणण्यासाठी येथील सर्वच घटकांनी मोठे योगदान दिले आहे. आगामी काळात लातूरच्या शैक्षणिक परंपरेला शोभेल असे वैदयकीय शिक्षणाचे संकूल उभारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या वैदयकीय महाविदयालयाच्या परीसरातच लोपॅथी बरोबर आयुर्वेदीक, होमीयोपॅथी, नॅचरोपॅथी, युनानी यासह नर्सीग व पॅरामेडीकलचे शिक्षण देणारी सर्व महाविदयालय सुरू करण्याच्यादृष्टीने पस्ताव तयार करावा त्यासाठी लागणाऱ्या अतरीक्त जागेची मागणीही नोंदवावी. या मागण्या मंजूर होणेसाठी सातत्याने पाठपूरावा केला जाईल असेही त्यांनी म्हटले आहे. विलासराव देशमुख वैदयकीय महाविदयालयाला संलग्न असलेल सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल त्वरित सुरू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. रिक्त जागा भरण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा. रुग्णालयात अत्यावश्यक असणाऱ्या औषधांचा पुरेसा साठा करून ठेवावा, रुग्णांना बाहेरून औषधे आणण्यास सांगू नयेत. महाविद्यालय व रुग्णालय परिसरात अवयव प्रत्यारोपण विभाग सुरू करावा. महाविद्यालय परिसरात सीसीटीव्ही, अग्निसुरक्षा व इतर महत्त्वाच्या यंत्रणा त्वरित उभाराव्यात. दर्जेदार शिक्षण, आणि तातडीच्या रुग्णसेवेसाठी वैद्यकीय अधिकारी तसेच संबंधित कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीवर विशेष लक्ष द्यावे. रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता डायलिसिस मशीनची आणि संबंधित प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी. वैद्यकीय सेवेसंबंधी महत्त्वाच्या असलेली एमआरआय, सिटीस्कॅन व इतर उपकरणे सुस्थितीत राहतील याची दक्षता घ्यावी. वैद्यकीय महाविद्यालयाच्या संदर्भाने मंजूर असलेली तीनशे ते चारशे कोटी रुपयांची बांधकामे सध्या सुरू आहे संबंधित विभागाने ती दर्जेदार पद्धतीने पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. महाविद्यालय परिसरात स्वच्छता राहील येथील, सांडपाण्याचा निचरा होईल याची लातूर महापालिकेने काळजी घ्यावी. महाविद्यालय परिसरातील वस्तीगृहात विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात त्याचबरोबर तात्पुरते क्रीडांगण उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने कार्यवाही करावी, यासह आवश्यक त्या सूचना आमदार अमित देशमुख यांनी यावेळी दिल्या. वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत असणारे डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांच्या मागण्यासंबंधी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल असे आश्वासनही या बैठकीदरम्यान राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिले.

या बैकीस डॉ. उमेश कानडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, उपअभियंता दत्तात्रय इंगळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. ढेले, वैद्यकीय अधीक्षक सचिन जाधव, डॉ. वडगावे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन रवींद्र काळे, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, उपसभापती सुनील पडीले, फारुख शेख, भारत बनसोडे, रमेश कांबळे, गणेश एसआर देशमुख, अकबर माडजे आदीसह विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अभ्यागत मंडळाचे माजी सदस्य, अधिकारी, कर्मचारी महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेला माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरानी पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तेथील सोयी-सुविधा तसेच नवीन प्रकल्प उभारणीसंबंधी आढावा बैठक घेतली, येथे एकाच ठिकाणी सर्व प्रकारचे वैद्यकीय शिक्षण मिळणारे हब निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करावा अशी सूचना करून त्यासाठी पाठपुरावा करण्याची ग्वाही दिली.

लोकनेते विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयच्या दक्षिण भागात लोकनेते विलासराव देशमुख यांचा पुतळा उभारावा अशी मागणी लातूरचे माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांनी या बैठकीत केली.

महाराष्ट्र स्टेट मेडिकल टीचर असोसिएशन लातूरचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे यांनी यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्याकडे संघटनेच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. वैद्यकीय शिक्षण मंत्री असताना आमदार अमित देशमुख यांनी जे महत्वाचे निर्णय घेतले त्यामुळे महाराष्ट्रातीलल सर्वच वैदयकीय महाविदयालयातील प्राध्यापकांची पदे भरली गेली आहेत. त्यांनी घेतलेल्या धाडसी निर्णयामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वैदयकीय अधिकारी तसेच इतर आवश्यक असलेल्या कर्मचारी भरती सदया सुरू असल्याचे त्यांनी म्हटले. वैदयकीय शिक्षण मंत्री असतांना आमदार अमित देशमुख यांनी महाराष्ट्र स्टेट मेडिकल टीचर असोसिएशनचे विविध प्रश्न सोडवल्याबद्दल त्यांचे संघटनेच्या वतीने डॉ. कानडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी आभार मानले.

# स्मशानभूमीसाठी तहसील समोर तीन तास ठिय्या आंदोलन..

अहमदपूर दि. तालुक्यातील मौजे ब्रम्हपूरी बोडका येथे मातंग समाजाच्या सूनिल भिमराव मोहाळे यांच्या निधनानंतर स्मशानभूमीच्या अभावी अंत्यविधीसाठी वहिवाटीची स्मशानभूमी येथे मज्ञाव केल्याच्या कारणाने अंत्यविधी काल पासून प्रलंबीत असल्याने गावकर्यांनी अखेर तहसिल कार्यालया समोर युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या अंदोलन केले.

या बाबत अधिक माहिती अशी की,काल मौजे ब्रम्हपूरी बोडका येथे सूनिल भिमराव मोहाळे यांच्या निधनानंतर अंत्यविधीसाठी वहिवाटीच्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यास मज्ञाव करण्यात आला.




त्यामूळे स्मशानभूमीसाठी जागा द्या,वहिवाटीच्या जागेवर प्रस्ताव दिल्या प्रमाणे भोगवटदार धथदमगावकरी यांच्या सोबत तहसिल कार्यालय येथे ठिय्या आंदोलन करण्यात आले.ही गंभीर बाब असल्याने याची माहिती तातडीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घूगे मॅडम, उपजिल्हाधिकारी प्रविण फूलारी,तहसिलदार शिवाजी पालेपाड, पोलिस निरीक्षक सुधाकर देडे यांना देण्यात आली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून प्रशासन सूध्दा ॲक्शन मोड आले.इकडे तहसिल कार्यालयापूढे कार्यकर्ते जमा झाले.जर दलित समाजाच्या व्यक्तीला अंत्यसंस्कार साठी जागा मिळाली नाही तर प्रसंगी तहसिल कार्यालयासमोर अंत्यविधी करू अशी भूमीका घेतल्याने प्रशासन खडबडून जागे होवून गावामध्ये तडजोड करण्यात आली.तूर्त वहिवाटीच्या शेजारी अंत्यसंस्कार करून पूढे सर्वांच्या सहमतीने स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करून देण्याचे अश्वासन तहसिलदार शिवाजी पालेपाड यांनी गावकऱ्यांना दिले.त्यानंतर तडजोडीच्या जागेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.या प्रसंगी समाजाचे नेते व सम्राट मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी, रामनाथ पलमटे,बालाजी शिंदे, ॲड.रमेश गायकवाड,विनोद नामपल्ले,पत्रकार अजय भालेराव, त्रीशरण मोहगांवकर, भिमराव कांबळे,गणेशराव मूंडे, सचिन बानाटे तसेच गावकरी व समाज बांधव सचिन मोहाळे,अनिल मोहाळे, नागनाथ मोहाळे,भिमराव मोहाळे, शिवानंद गवळे, सखाराम गवळे सुनिल कोमले, विशाल मोहाळे, सुनिल जंगापल्ले, लक्ष्मण जंगापल्ले, चंद्रकांत पलमटे, विनायक गवळे, विठ्ठल गवळे, एकनाथ गवळे, दयानंद गवळे, कोंडीबा वाघमारे आदी समाज बांधवांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## 'केशवराज' मधील पाच हजार विद्यार्थी व शिक्षकांना भगवद्गीतेचे वाटप



लातूर/प्रतिनिधी : श्रीकृष्ण जन्मोत्सवा निमित्त येथील श्री. केशवराज माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांना भगवद्गीतेच्या प्रतींचे पुणे येथील गीताधर्म मंडळाच्या अध्यक्षा सौ.संध्या कुलकर्णी व मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. पाच हजार विद्यार्थी व शिक्षकांना भगवद्गीतेचे वितरण करणारी श्री. केशवराज माध्यमिक विद्यालय ही एकमेव शाळा आहे.

या प्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रविण सरदेशमुख, संजय गुरव,श्री केशवराज शैक्षणिक संकुल स्थानिक समन्वय समिती कार्यवाह शैलेश कुलकर्णी, उपमुख्याध्यापक तथा विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे,पर्यवेक्षक संदीप देशमुख,दिलीप चव्हाण, पर्यवेक्षिका श्रीमती अंजली निर्मळे यांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी सर्व विद्यार्थी, शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी भगवद्गीतेच्या बाराव्या व पंधराव्या अध्यायाचे पठण केले.

सौ.संध्या कुलकर्णी मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या की,श्रीकृष्ण जन्मोत्सव हा भारतीय संस्कृती जोपासणारा उत्सव आहे.भगवद्गीता हा ग्रंथ विद्यार्थ्यांच्या मनावर संस्कार करणारा ग्रंथ आहे.भगवद्गीतेच्या पाच हजार प्रतींचे वितरण आज केशवराज विद्यालयात झाल्याचा अनुभव घेऊन मी खूप भारावून गेले आहे,असे सांगून सौ. कुलकर्णी यांनी श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील भगवद्गीता पठण या उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती शैला जेऊरकर यांनी केले.

मान्यवरांचा परिचय व स्वागत श्रीमती कांचन तोडकर,सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन चैताली कुलकर्णी,भार्गवी कुलकर्णी या विद्यार्थिनींनी केले.श्रीमती शैला जेऊरकर यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक प्रदीप कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात पर्यवेक्षक बबन गायकवाड, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीमती शैला सांगवीकर,सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## खा. सुप्रियाताई सुळे यांच्या उपस्थितीत माजी नगरसेविकांसह काँग्रेस व भाजपाच्या कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश



लातूर : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या संसदरत्न खा. सुप्रियाताई सुळे यांच्या उपस्थितीत लातूरच्या माजी नगरसेविकांसह काँग्रेस व भाजपाच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार ,राष्ट्रीय कार्याध्यक्षा संसदरत्न खा.सुप्रियाताई सुळे,प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेसचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या खा.सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी नगरसेविका सुमन ज्ञानोबा गायकवाड, माजी युवक काँग्रेस पक्षाचे लातूर शहर कार्याध्यक्ष रघुनाथ मदने, युवक शहर उपाध्यक्ष सलीम घंटे, भाजपचे पदाधिकारी नवीद आरिफभाई सिद्दीकी, युथ फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत संभाजी अनेराये , तुकाराम बालाजी चपटे यांच्या असंख्य सहकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ओबीसी विभाग लातूर शहर जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती पत्र खा.सुप्रियाताई सुळे यांच्या हस्ते रघुनाथ मदने यांना देण्यात आले. या निवडीचे प्रदेश सरचिटणीस बस्वराज पाटील नागराळकर,लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार,प्रदेश सचिव संजयजी शेटे ,लातूर जिल्हा निरिक्षक डॉ. नरेंद्र काळे, राष्ट्रवादी युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, युवक कार्याध्यक्ष चंदन बसवराज पाटील नागराळकर, युवक प्रदेश सरचिटणीस निशांत वाघमारे, प्रा.प्रशांत घार,महिला शहर जिल्हाध्यक्षा सौ.रेखाताई कदम, कार्याध्यक्षा मनिषा कोकणे, माजी नगरसेविका छायाताई चिंदे, युवक शहराध्यक्ष समीर शेख, प्रसिध्दी प्रमुख डी.उमाकांत, जाकीर तांबोळी,युवा नेते सिद्धार्थ (आबा )सूर्यवंशी, खंडू लोंढे, तोसिफ शेख,शाहरूख पठाण,आदर्श उपाध्ये यांच्यासह शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर, दि. ८ (जिमाका): राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे ९ सप्टेंबर, २०२३ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.

क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे हे सकाळी साडेनऊ वाजता लातूर येथून जळकोटकडे प्रयाण करतील. सकाळी अकरा वाजता जळकोट येथील जळकोट-कुनाकी रोडवरील तिरुमला मंगल कार्यालयात आयोजित महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, लातूर अंतर्गत प्रधानमंत्री ग्रामसडक योजना कामाच्या (कुणकी – जळकोट – हळदवाढवणा–रावणकोळा रस्ता) भूमिपूजन सोहळ्यास ते उपस्थित राहतील.

दुपारी साडेतीन वाजता उदगीर येथील देगलूर रोडवरील राधेकृष्ण मंगल कार्यालयात आयोजित पदवीदान व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभास ना. बनसोडे उपस्थित राहतील. सायंकाळी साडेपाच वाजता उदगीर येथील श्यामलाल मैदान येथे श्यामलाल विज्ञान, कला व क्रीडा अकादमीतर्फे आयोजित सांस्कृतिक महानाट्य 'बखर हौतात्म्याची' च्या उद्घाटन कार्यक्रमास ते उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीनुसार लातूरकडे प्रयाण करतील.

## देवरूख शहराच्या विकासासाठी कायमस्वरूपी कटीबद्ध- आ. शेखर निकम

### देवरूख येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) दहीहंडी कार्यक्रमात आ. शेखर निकम यांचा सत्कार

देवरूख/ प्रतिनिधी : माझ्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी अतिशय उत्तम पद्धतीने नियोजन केलं आपणा सगळ्यांना मनापासून धन्यवाद देतो. आपल्या सगळ्यांना गोकुळाष्टमीच्या शुभेच्छा देत असताना या देवरुख शहराचा विकास करणे हेच काम आपल्याला पुढील काळात महायुतीच्या माध्यमातून करायचे आहे आणि आम्ही ते निश्चितच करू, असे प्रतिपादन चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांनी देवरुख येथे केले.

संगमेश्वर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व देवरुख शहर राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांच्यावतीने काल गुरूवारी देवरुख छत्रपती शिवाजी महाराज चौक नजीक उभारण्यात आलेल्या दहीहंडी कार्यक्रमाप्रसंगी आमदार शेखर निकम यांचा सोळजाई देवस्थानचे अध्यक्ष बापू गांधी यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. देवरुख शहराच्या विकासाकरिता आमदार शेखर निकम यांनी चार कोटी मंजूर केल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस तालुक्याच्या वतीने आमदार श्री. निकम यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या सत्कारला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेससह भाजपा बरोबरच




अन्य पक्षाचे कार्यकर्ते देखील उपस्थित होते.

कार्यक्रमात प्रारंभी चिपळूणच्या माजी सभापती पूजा निकम यांच्याहस्ते मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष राजेंद्र पोमेंडकर, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य संदेश शेट्ये, राष्ट्रवादीचे तालुका संघटक बाळू ढवळे, आरडीसीसी बँकेच्या संचालिका नेहा माने, युवक तालुकाध्यक्ष पंकज पुसाळकर, माजी नगरसेवक प्रफुल्ल भुवड, प्रताप सावंत, मोहन वनकर, नितीन भोसले, हुसेन बोबडे, राजू वणकुद्रे, महिला तालुकाध्यक्ष दुर्वा वेल्हाळ, भाजपचे तालुकाध्यक्ष प्रमोद अधटराव, विनोद म्हस्के, रुपेश कदम, मिथुन निकम, अभिजीत शेट्ये, माजी जिल्हा परिषद सदस्य मुग्धा जागुष्टे यांसह अनेक राष्ट्रवादीचे कार्यकर्ते व अन्य पक्षांचे कार्यकर्ते महिला उपस्थित होत्या.

यावेळी अनेक गोविंदा पथकांनी थरावर थर लावत सलामी देऊन हजारो रुपयांची बक्षीसे पटकावली.

यावेळी सुंदर नृत्यविष्कार सादर करण्यात आला. या नृत्यावर अनेकांनी ठेका धरला.

# बालदमा आजारावर आधुनिक पध्दतीने उपचार शक्य

## लातूर येथील एमआयटीत आयोजीत बालदमा प्रशिक्षण शिबीरात मान्यवरांचे मार्गदर्शन

लातूर दि.०८- लातूर एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयायतील बालरोग विभाग आणि लातूर बाल रोग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर एमआयटी येथे आयोजित करण्यात आलेल्या बालदमा या विषयावर प्रशिक्षण शिबीरात अनेक मान्यवरांनी पालकांमध्ये बालदमा आजाराविषयी असलेले गैरसमज याबाबत मार्गदर्शन करून या आजारावर आधुनिक पध्दतीने उपचार शक्य असल्याचे सांगितले.



बालदमा हा लहान मुलांमध्ये होणारा श्र्वास नालिकेचा सामान्य आजार आहे. यामध्ये श्र्वास नलिका अरुंद होतात, आकुंचन पावतात व त्यावर सूज येते त्यामुळे फुफुसामधे वायू प्रवाहात आडथळा निर्माण होतो. विविध प्रक्षोभक व पर्यावरणातील प्रदूषणामुळे दमा होऊ शकतो. १० ते १२ टक्के मुलांना हा त्रास होऊ शकतो. बाल दम्या वरील आधुनिक उपचार पद्धती व त्याचे निदान जाणून घेण्यासाठी एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयात बालरोग तज्ज्ञ डॉक्टरांसाठी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन.पी.जमादार यांच्या मार्गदर्शनाखाली एक दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

या प्रशिक्षण शिबीरासाठी इंदोरचे डॉ. संजिवसिंग राऊत, पुणे येथील डॉ. शीशीर मोडक आणि मुंबई येथील डॉ. सागर वरणकर हे आले होते. या प्रशिक्षणात बालदमा कशामुळे होतो त्यांची लक्षणे निदान करण्याच्या पद्धती तसेच त्यावरील उपाय व उपचारासाठी लागणारी साधने यावर सखोल मार्गदर्शन केल. आजही ७०टक्के पालकांमध्ये बाल दमा आजाराविषयी बरेच गैरसमज आहेत. इन्हेलर व स्पेसर व्दारे औषध देणे ही अत्यंत साधी व उपयुक्त पद्धत असताना सुद्धा पालक ती घेण्यास टाळाटाळ करतात त्यामुळे बाळाचा आजार बळावतो व प्रसंगी त्याला अतिदक्षता विभागात दाखल करावे लागते. तज्ञांच्या म्हणण्यानुसार इन्हेलर व स्पेसर व्दारे औषध देणे हेच उत्तम उपाय आहे व डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार औषधे घेतल्यावर बाल दमा आटोक्यात येऊ शकतो.

या कार्यशाळेचे उद्घटन एमआयटी महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा यांच्या हस्ते करण्यात आले. भारतीय वैदकिया संघटनेचे अध्यक्ष डॉ. राठी यांनीही मार्गदर्शन केले.

प्रारंभी बालरोग विभागाचे डॉ. भट्टड सर यांनी कार्यक्रमाची प्रस्ताविक करून प्रशिक्षकांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन बालरोग विभागाचे निवासी डॉ. स्नेहल सोनकांबळे यांनी केले तर शेवटी बालरोग विभाग प्रमुख डॉ विद्या कांदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

लातूर बालरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. विनोद स्वामी यांनी कार्यक्रमाची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी लातूर बालरोग विभाग संघटनेचे सचिव डॉ. असद पठाण, कोषाध्यक्ष डॉ. सुनील होळीकर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून डॉ. दीपिका माशाळकर यांनी महत्वाची भूमिका निभावली. कार्यशाळेसाठी लातूर, उस्मनाबाद, बीड, नांदेड, केज, अंबेजोगाई येथील बालरोगतज्ञ उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एम आय एम एस आर वैद्यकीय कॉलेज मधील डॉ. दीपिका माशाळकर, असिस्टंट प्रोफेसर डॉ. शिल्पा दडगे ,डॉ मंगेश डाके आणि असोसिएट प्रोफेसर डॉ. संतोष बजाज, डॉ. स्नेहल, डॉ. अभिषेक, डॉ. निकिता, डॉ. अंकिता, डॉ. संकेत, डॉ. स्नेहा यांनी प्रचंड मेहनत घेतली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE